सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in
bee@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा / छावता / ६८३ **दिनांक** : १५ / ०५ / २०२६

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा नगर हवेली)

**विषय : सत्रपूर्तता संपलेल्या अंतीम व अंतीमपूर्व वर्षातील फक्त अनुशेष विषय असणाऱ्या परीक्षार्थ्यांच्या बाबत...**

महोदय / महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना याद्वारे कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे अंतीम व अंतीमपूर्व वर्षातील फक्त अनुशेष विषय (Only backlog subjects) अद्याप अनुत्तीर्ण आहेत, ते पूर्ण करुन पदवी प्राप्त करण्याची अंतीम संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. अंतिम वर्ष अनुत्तीर्ण असलेले, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी.
२. अंतिमपूर्व वर्षातील अनुत्तीर्ण असलेले परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे, तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम पूर्व वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे की ज्यांची सोडवणूक निश्चित केलेल्या विहित कालावधीमध्ये पूर्ण होईल असे सर्व विद्यार्थी.
३. मौखिक, प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट, सेमीनार, डेझरटेशन इ. व अशा इतर अनुषंगिक सर्व हेडच्या परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण असणारे परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी.

सदर विशेष सवलत दिलेल्या विद्यार्थ्यांना नियमित परीक्षांमध्ये सामावून घेणे शक्य असल्यास ते समकक्ष विषयांनुसार परीक्षा देतील. वरील क्रमांक १ ते ३ मध्ये नमूद केलेल्या धोरणानुसार पात्र विद्यार्थ्यांना विशेष संधी मिळाल्यानंतरच्या काळात यापैकी कोणत्याही विद्यार्थ्यांस व अशा इतर विद्यार्थ्यांना भविष्यकाळात संधी दिली जाणार नाही.

सदर निर्णयानुसार, विद्यापीठाने दिनांक ३०/०४/२०२६ रोजी जा.क्र./छावता/६४१ नुसार जाहीर प्रकटन प्रसिध्द केले आहे, त्यानुसार प्रक्रिया करण्यात आली असुन अंतीम व अंतीमपूर्व वर्षातील फक्त अनुशेष विषयांच्या (Only backlog subjects) परीक्षा देऊन, उत्तीर्ण झाल्यास पदवी प्राप्त करण्याच्या अंतीम संधीस पात्र असणा—या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रिया विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन दिनांक १५ मे, २०२६ पासुन सुरु करण्यात येत आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत परीक्षा अर्ज भरुन विहीत पध्दतीने सादर करावेत व निर्धारीत शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.

सदर पत्राचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा. मा.प्राचार्यांना यापुढे विनंती करण्यात येते की, या संदर्भातील कार्यवाहीसाठी व उद्भवलेल्या शंकासाठी, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी (CEO) यांचेमार्फतच विद्यापीठाकडे संपर्क करावा. विद्यार्थी/पालक यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. यामुळे विद्यार्थ्यांचा व पालकांचा प्रवास, अनुषांगिक खर्च व वेळ वाचु शकेल. तसेच विद्यापीठ व महाविद्यालयांनी राष्ट्रीय हिताच्या व प्राध्यान्याच्या आवाहनास प्रतिसाद दिला असे दिसेल. तसेच विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळेल यासाठी पुढाकार घ्यावा.

कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची योग्य ती दक्षता घेवून कार्यवाही करावी व विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ